# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**०७) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २४.०३.२०२६**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (१७/०३/२०२६ ते २३/०३/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२५/०३/२०२६ ते २९/०३/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | दिनांक | २५ | २६ | २७ | २८ | २९ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | १ | २ | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३८ | ३९ | ३९ | ३८ | ३७ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २० | २१ | २० | १९ | १८ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ३ | २ | ० | ० | १ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७२ | ७७ | ७३ | ७७ | ९४ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६० | ६० | ५९ | ५७ | ६३ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ८ | १० | १२ | १३ | १३ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **पुढील दोन दिवस आकाश अंशता ढगाळ राहील तसेच दि. २५ व २६ मार्च रोजी काही ठिकाणी विजांच्या कडकडाट व जोराच्या वाऱ्यासह "अतिशय हलका पावसाची शक्यता"** आहे. |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) शेतकरी बंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वतः ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.<br>३) वाढत्या तापमानाच्या अनुषंगाने मातीतील ओलावा वाचवण्यासाठी अच्छादनाचा वापर करावा, त्याकरीता गवताचा/ पिकाचे अवशेषपॉलिथीन /चा उपयोग करावा. |
| संदेश | | **पावसाची पावसाची शक्यता असल्याने कापणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी/ शेडमध्ये ठेवावीत किंवा प्लास्टिक पेपरने झाकून ठेवावीत.** |
| गहू | काढणी | पावसाची शक्यता असल्याने गहू पिकाची कापणी पूर्ण करून घ्यावी काढलेले धान्य सुरक्षित ठिकाणी साठवावे. |
| हरभरा | काढणी | गारपीट आणि पावसाची शक्यता असल्याने हरभरा पिकाची काढणी पूर्ण करून घ्यावी काढलेले धान्य सुरक्षित ठिकाणी साठवावे. |
| भुईमूग | | सध्याचे हवामान भुईमुगाची पाने पोखरणाऱ्या अळीच्या प्रादुर्भावासाठी अनुकूल असल्याने क्विनालफॉस २५ ईसी @ २० मिलि किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. @ ३ मिलि किंवा ॲसेफेट७५ एस.पी. @ १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| उन्हाळी भाजीपाला | | उन्हाळी भाजीपाला पिकांवर माव्याचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. म्हणून सतत देखरेख ठेवावी आणि सुरुवातीच्या प्रादुर्भावाच्या निरीक्षणावर कडुनिंबावर आधारित कीटकनाशकांची फवारणी करावी. |
| लिंबू वर्गीय पिके | | लिंबू वर्गीय बागांमध्ये सायला आणि फुलकीडीचे नुकसान टाळण्यासाठी, स्वच्छ हवामानात इमिडाक्लोप्रिड ३०.५ एससी @ ५ मिलि प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| साठवायाचे बियाणे | साठवणूक | गारपीट आणि पावसाची शक्यता असल्याने साठवण करावयाच्या कडधान्यांचे किडीपासून संरक्षण करण्यासाठी एरंडेल / जवस / करंज / कडुनिंबाचे तेल @ ३ - ५ मिलि प्रति किलो धान्य या प्रमाणात वापरावे. साठवायचे बियाणे साठवणीतील धान्यांचे किड्यांपासून संरक्षण करण्यासाठी, कापणी केलेल्या पिकांच्या धान्यमधे ११-१२%, कडधान्ये ९%, तेलबिया ८% आणि भाजीपाला बियाणे ५-६% इतका ओलावा राहील, अशा पद्धतीने बियाणे वाळवावेत. साठवणीतील धान्याचे किड्यापासून सरक्षण करण्यासाठी कापणी केलेल्या पिकाच्या धान्यामध्ये ११-१२%, कडधान्ये ९%, तेलबिया ८% आणि भाजीपाला बियाणे ५-६% ईतका ओलावा राहील आशा पद्धतीने बियाणे वाळवावे. |
| भाजीपाला पिके | | जोराच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता असल्याने वेलवर्गीय भाज्यांना आधार द्यावा जेणेकरून वारा आणि पावसामुळे त्यांचे नुकसान होणार नाही. शक्य असल्यास उघड्यावर असलेली रोपवाटिका प्लास्टिक पेपरने झाकून घ्यावी. |
| फळ पिके | | जोराच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता असल्याने फळ झाडांना आधार द्यावा जेणेकरून वारा आणि पावसामुळे |

| | | |
|---|---|---|
| | | त्यांचे नुकसान होणार नाही. |
| **पशुसंवर्धन** | | वाढत्या तापमाच्या अनुषंगाने जनावरांना सावलीत बांधावे आणि पिण्यास भरपूर स्वच्छ आणि थंड पाणी द्यावे. जनावरांकडून सकाळी १२ ते दुपारी ३ वाजेच्या दरम्यान काम करू घेवु नये. हिरवे गवत, प्रथिनेयुक्त, खनिज मिश्रण आणि मीठयुक्त खाद्य द्यावे. जनावरे सकाळी किवा सायंकाळी चरावयास न्यावे. तापमान कमी करण्यासाठी शेडचे छत पेंढ्याने झाकावे तसेच भिंतींना पांढरे रंग द्यावा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : २४.०३.२०२६

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**